# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १९-८-२०१७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक १९ ऑगस्ट २०१७ रोजी (का.प.क्र.४६) मा.महापौर श्री. भगवान (बापू) देविदास घडमोडे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.०० वावंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.डी.एम मुगळीकर भाप्रसे, नगरसचिव,श्री डी.डी.सुर्यवंशी संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| ११. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १२. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १३. | स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १४. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १५. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १६. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १७. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १८. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १९. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| २०. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| २१. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २२. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २३. | स.स. श्रीमती परवीन खैसर खान |
| २४. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २५. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २६. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २७. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २९. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| ३०. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| ३१. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ३२. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३३. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३४. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३५. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३६. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३७. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३८. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३९. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ४०. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ४१. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ४२. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ४३. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४४. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४५. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४६. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४७. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४८. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४९. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ५०. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ५१. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ५२. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५३. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५४. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ५५. | स.स.श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५६. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५७. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५८. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ५९. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ६०. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ६१. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ६२. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ६३. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६४. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |

| | |
|---|---|
| ६५. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६६. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ६७. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६८. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६९. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ७०. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ७१. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ७२. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ७३. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ७४. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ७५. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७६. | स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन |
| ७७. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७८. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७९. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ८०. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ८१. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ८२. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ८३. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ८४. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८५. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८६. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८७. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८८. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ८९. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ९०. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ९१. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ९२. | स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| ९३. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ९४. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ९५. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ९६. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९७. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ९८. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| ९९. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

नामनिर्देशित पालिका  सदस्यांची नावे

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन

(वंदेमातरम् चालू असतांना स.सदस्य श्री.सोहेल शकील शेख व श्री.सय्यद मतीन रशीद हे सभागृहात आसनावरच बसलेले होते.)

श्री.दिलीप थोरात :स.सदस्या श्रीमती माधुरी देशमुख यांचे काका स्व अशोक देशमुख-अदवंत यांचे दु:खद निधन झाले तसेच स.माजी सदस्या श्रीमती चंद्रभागाबाई दाणे यांचे निधन झाले त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे झालेल्या क्रांती मोर्चात सहभागी झालेले व प्रवास करताना ज्यांचे अपघाती निधन झाले त्यामध्ये श्री.अविनाश गव्हाणे, नारायण थोरात, तसेच हर्षल घोलप यांचे निधन झाले त्यांनी ही श्रध्दाजंली अर्पण करावी.

यास स.श्रीमती किर्ती शिंदे तसेच स.श्री.नंदकुमार घोडेले यांनी अनुमोदन दिले.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.

यावेळी स्व. अशोक देशमुख-अदवंत,स्व.चंद्रभागाबाई दाणे, अविनाश गव्हाणे, नारायण थोरात,हर्षल घोलप यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री रावसाहेब आमले :वंदेमातरम् गीत चालू असतांना दोन सदस्यांनी उभे राहून त्यांनी गीत म्हटले नाही. त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी. हा सभागृहाचा अपमान आहे.

श्री.गजानन बारवाल :हे योग्य नाही. त्यांचेवर कार्यवाही करावी.

(या वेळी सदस्यवंदेमातरम्, भारतमाता की जय च्या घोषणा देतात.)

मा.महापौर :अशा सदस्यांवर कार्यवाही होईल सर्वांनी जागेवर बसावे.

(या वेळी डायस समोर स.सदस्य एकत्रितपणे मोठमोठयाने घोषणा देतात.)

मा.महापौर :जे सदस्य सभागृहाचा अपमान करीत असतील जे खाली बसत असतील त्यांना आजच्या दिवसापूरते निलंबीत करण्यात येते.

श्री.दिलीप थोरात :जे सभागृहाचा अपमान करतात अशा सदस्यांना बाहेर जाण्यास सांगावे.

(या वेळी सदस्यवंदेमातरम्, भारतमाता की जय च्या घोषणा देतात.)

मा.महापौर :सभा थोडया वेळासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ दु.१२-०५ वाजता)

दु. १२.०५ वाजता तहकूब केलेली सभा पुन्हा १२-१५ वाजता सुरू झाली.

मा.महापौर : सर्वानी आपआपल्या जागेवर बसावे , (अनेक वेळा मा.महापौर सदस्यांना जागेवर बसण्या बाबत सुचना करीत असतात)

श्री.प्रमोद राठोड :ज्यांनीवंदेमातरम् गिताचा अवमान केला त्यांना सभागृहा बाहेर काढावे.

श्री.रावसाहेब आमले :अशा सदस्यांना सभागृहाच्या बाहेर काढावे.

या वेळी डायस समोर घोषणाबाजी चालू असते.

मा.महापौर :सर्वानी जागेवर बसावे सभागृहाची शिस्त कुणी बिघडवली तर खपवून घेतले जाणार नाही. आपआपल्या जागेवर जाऊन आपले म्हणणे मांडावे.

श्री.प्रमोद राठोड :ज्यांनी माईक तोडले सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले आहे. त्यांचेवर गुन्हे दाखल करावे.

श्री.दिलीप थोरात :ज्यांना निलंबीत केले त्यांना सभागृहा बाहेर काढावे.

या वेळी अनेक सदस्य डायस समोर उभे असतात.

मा.महापौर :सभागृहाचा सन्मान राखला पाहिजे सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.जे जागेवर बसणार नाही त्यांचेवरही निलंबणाची कार्यवाही होईल.

या वेळी डायस समोर सदस्य जाऊन राजदंड उचलण्याचा प्रयत्न करतात. काही सदस्य डायससमोर खाली बसतात व घोषणा देतात.

श्री.अफसर खान :वंदेमातरम्चा विषय देशभरात चालू आहे. त्याचे काय आले?

श्री.गजानन बारवाल :सदस्यांनी जागेवर बसुन आपआपले म्हणणे मांडावे.

श्री.रावसाहेब आमले :वंदेमातरम् चालू असतांना जे सदस्य खाली बसलेले होते त्यांनी या देशाचा सभागृहाचा अपमान केलेला आहे त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :स.सदस्यांचे काय म्हणणे आहे जागेवर उभे राहून मांडावे.

श्री.प्रमोद राठोड :ज्यांना निलंबीत केले त्यांना बाहेर जाण्यास सांगावे.

(या वेळी पुन्हा डायस समोर स.सदस्य घोषणा देतात.

मा.महापौर :ज्या सदस्यांचे निलंबन केले त्यांनी सभागृहा बाहेर जावे.जे सभागृहात गोधंळ घालतील त्यांचेही निलंबन करण्यात येईल पुन्हा सभा तहकूब करण्यात येते (वेळ १२.२० वाजता)

(यावेळी काही सदस्य माईक व फॅन उचलतात.)

(पुन्हा सभेला सुरूवात १.२० वाजता)

या वेळी काही महिला स.सदस्या भारतमातेची प्रतिमा मा.महापौर यांचेकडे देतात व सदर प्रतिमा सभागृहात लावण्यात यावी अशी मागणी करतात.)

श्री.गजानन बारवाल :झालेला प्रकार दुर्दैवी आहे. वंदेमातरम संदर्भात जो प्रकार झाला तो बरोबर नाही. संबंधीतावर कार्यवाही करावी. त्यांना सभागृहा बाहेर काढावे.

श्री राजू शिंदे :हे सभागृह सर्वोच्च सभागृह आहे. सदस्यांनी मान ठेवला पाहिजे.या देशात राहायचे असेल तर वंदेमातरम् म्हणावे लागेल.अवमान करणाऱ्या सदस्यांचे निलंबन करावे. ज्या सदस्यांनी मालमत्तेचे नुकसान केले त्यांच्यावर गुन्हे दाखल करावे.

श्री.नासेर सिध्दीकी :हा देश कुणाच्या बापाचा नाही

श्री.राजेंद्र जंजाळ :असंसदीय शब्द सदस्य वापरत आहे. सभागृहाचा अपमान करीत आहे त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा.महापौर :या सभागृहात असभ्य वर्तन चालणार नाही. हे शब्द बोलणे योग्य नाही. ते शब्द त्यांनी मागे घ्यावे.

श्री.नासेर सिध्दीकी :माझ्याही बापाचा हा देश नाही. या देशात राहयचे असेल तर अमुक बोललेच पाहिजे असे म्हणणे योग्य नाही.

मा.महापौर :या सभागृहामध्ये असे असभ्य वर्तन करू नये. असे असभ्य वर्तन या सभागृहात चालणार नाही. सभागृहाची शिस्त राखली जात नाही. स.श्री.शेख जफर शेख अख्तर व स.श्री.सय्यद मतीन रशिद यांचे निलंबन करण्यात आलेले आहे.

त्यांनी सभागृहातून बाहेर जावे. त्यांनी महापालिकेच्या मालमत्तेचे नुकसान केलेले आहे. मी प्रशासनास आदेशीत करतो की, स.सदस्य श्री.शेख जफर शेख अख्तर व स.सदस्य श्री.सय्यद मतीन रशिद यांच्यावर पोलीसात गुन्हे दाखल करण्यात यावे. व स.सदस्या श्रीमती शेख समिना शेख इलियास यांचे पण सभासदत्व निलंबन करण्यात येते. कारण त्यांनी सुध्दा सभागृहात गैरवर्तन केलेले आहे. आज सभागृहात घडलेल्या घटनेचा अहवाल शासनाला सुध्दा पाठविण्यात यावा. काही सदस्य सभागृहात गैरवर्तणुक करीत आहेत व शहरातील वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करीत आहेत. जे कुणी सदस्य शहराचे वातावरण या सभागृहाच्या माध्यमातून खराब करतील त्यांची गय केली जाणार नाही. ही सभा तहकूब करण्यात येत आहे.

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी),
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.